RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ४, अंक १३८(३)] शुक्रवार, ऑक्टोबर २६, २०१८/कार्तिक ४, शके १९४० [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक ३९४**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २६ ऑक्टोबर २०१८

**अधिसूचना**

**महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६.**

क्रमांक परिनि-२०१८/प्र.क्र.१०३/विशि-२.—महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (२०१७ चा महा. अधि. ६) याच्या कलम ७२ चे पोट-कलम (१०) तसेच कलम ९९ च्या पोट-कलम (२) चा खंड (च), पोट-कलम (३) चा खंड (च) व पोट-कलम (४) च्या खंड (ख) च्या उप खंड (पाच) यांद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे उक्त अधिनियमान्वये राष्ट्रीय सेवा योजनेमधील, राष्ट्रीय छात्रसेनेमधील विद्यार्थी परिषदेवरील क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या नामनिर्देशनाशी संबंधित पुढील परिनियम विहित करीत आहे :—

**सन २०१८ चा एकरुप परिनियम क्रमांक ७.**

१. **संक्षिप्त नाव**.— या परिनियमास, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (राष्ट्रीय सेवा योजनेतील, राष्ट्रीय छात्रसेनेतील, विद्यार्थी परिषदेवरील क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांमधील विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन) एकरूप परिनियम, २०१८, असे म्हणावे.

२. **विविध विद्यार्थी परिषदांवरील विद्यार्थ्यांचे नामनिर्देशन**.- महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. अधि. ६) यांच्या संबंधित तरतुदींन्वये राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, विद्यापीठ विभाग विद्यार्थी परिषदेचे किंवा महाविद्यालय विद्यार्थी परिषदेचे किंवा विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम यांमधून करण्यात येणारे नामनिर्देशन हे, यात यापुढे विहित केल्याप्रमाणे मागील शैक्षणिक वर्षातील संबंधित उपक्रमांमधील विद्यार्थ्यांच्या उच्चस्तरीय उत्कृष्ट कामगिरीच्या आधारावर कुलगुरुमार्फत करण्यात येईल :—

(१) **राष्ट्रीय सेवा योजनेमधून** :–विद्यार्थ्याने नावनोंदणीकृत स्वयंसेवक म्हणून राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये किमान एका वर्षाकरिता भाग घेतला असला पाहिजे आणि त्या वर्षभरात त्याची किमान १२० तास इतकी उपस्थिती असली पाहिजे आणि त्याने किमान सात

दिवसांच्या एका शिबीरास उपस्थित राहिले असले पाहिजे. अशा विद्यार्थ्याने मागील वर्षामध्ये, त्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचा राष्ट्रीय सेवा योजनेचा स्वयंसेवक म्हणून प्रादेशिक किंवा राज्य किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिबिरे, स्पर्धा, संचलने आणि कोणत्याही अन्य प्रासंगिक कार्यक्रमामध्ये सहभागी होऊन अत्युच्च कामगिरी व यश संपादन केलेले असले पाहिजे.

(२) **राष्ट्रीय छात्रसेनेमधून** :- विद्यार्थ्याने, किमान एका वर्षाकरिता वरिष्ठ स्तरावरील औपचारिक राष्ट्रीय छात्रसेना प्रशिक्षण घेतेलेले असले पाहिजे आणि तो राष्ट्रीय छात्र सेनेच्या किमान ७५ टक्के संचलनांना उपस्थित राहिलेला असला पाहिजे आणि त्याने राष्ट्रीय छात्र सेनेच्या किमान एका वार्षिक प्रशिक्षण शिबिरास उपस्थित राहिलेले असले पाहिजे. अशा विद्यार्थ्याने मागील वर्षामध्ये राष्ट्रीय छात्रसेना ‘बी’ किंवा ‘सी’ प्रमाणपत्र परीक्षेमध्ये किंवा महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचा राष्ट्रीय छात्रसैनिक म्हणून प्रादेशिक किंवा राज्य किंवा राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावरील शिबिरे,स्पर्धा,संचलने आणि इतर प्रासंगिक कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन अत्युच्य कामगिरी व यश संपादन केलेले असले पाहिजे.

(३) **क्रीडा उपक्रमांमधून** :- विद्यार्थ्याने आंतरमहाविद्यालयीन क्रीडा महोत्सवामध्ये किमान एकदा महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व केलेले असले पाहिजे. अशा विद्यार्थ्याने मागील वर्षामध्ये विद्यापीठाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या प्राधिकरणांनी आयोजित केलेले आंतरमहाविद्यालयीन किंवा आंतरक्षेत्रीय किंवा आंतर-विद्यापीठीय क्रीडा महोत्सव स्पर्धा, प्रासंगिक कार्यक्रम यांमध्ये त्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिति विद्यापीठाचे प्रतिनिधी म्हणून व्यक्तिगतरित्या अथवा त्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा विद्यापीठ विभांगांचा संघ प्रतिनिधी म्हणून अत्युच्च कामगिरी व यश संपादन केलेले असले पाहिजे परंतु जर त्या महाविद्यालयात किंवा परिसंस्थेत किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागात, एखाद्या विवक्षित क्रीडा प्रकाराकरिता सुविधा उपलब्ध नसतील तर, वरीलप्रमाणे क्रीडा कार्यक्रमांमध्ये सहभागी होणारा विद्यार्थी, जरी तो त्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिति, विद्यापीठ विभागाचे प्रतिनिधीत्व करीत नसेल तरी, तो अशा नामनिर्देशनासाठी पात्र असल्याचे मानण्यात येईल.

(४) **सांस्कृतिक उपक्रमांमधून** :- विद्यार्थ्याने, मागील वर्षामध्ये महाविद्यालयीन किंवा आंतरक्षेत्रीय किंवा आंतर-विद्यापीठीय किंवा राज्य वा राष्ट्रीय वा आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाने किंवा भारतीय विद्यापीठ संघाने किंवा राज्य शासनाच्या किंवा केंद्र सरकारच्या कोणत्याही प्राधिकरणांनी आयोजित केलेल्या, नृत्य, नाट्य, संगीत, वक्तृत्व, वादविवाद, साहित्य, ललित कला,यांसारख्या सांस्कृतिक स्पर्धांमध्ये व प्रासंगिक कार्यक्रमांमध्ये (युवकमहोत्सव, इंद्रधुनष्य, राज्य किंवा राष्ट्रीय युवक महोत्सव यांसारखे कार्यक्रम) त्या महाविद्यालयाचे किंवा परिसंस्थेचे किंवा यथास्थिती विद्यापीठ विभागाचे प्रतिनिधी म्हणून व्यक्तिगतरित्या किंवा त्या महाविद्यालयाचा किंवा परिसंस्थेचा किंवा यथास्थिती, विद्यापीठ विभागाचा संघ प्रतिनिधी म्हणून अत्युच्च कामगिरी किंवा यश संपादन केलेले असले पाहिजे.

३. नामनिर्देशित करावयाचे विद्यार्थी हे मागील वर्षामध्ये कोणत्याही अनुशेषाशिवाय किंवा सत्र पुढे चालू ठेवण्याच्या अनुमतीचा (एटीकेटीचा) लाभ न घेता सर्व प्रमुख विषय उत्तीर्ण झालेले असले पाहिजेत.

४. विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचा अध्यक्ष, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महा. अधि. ६) याच्या संबद्ध तरतुदींन्वये, संचालक, विद्यार्थी विकास याच्याशी विचारविनिमय करून, विद्यापीठ विद्यार्थी परिषदेसाठी अशा विद्यार्थ्यांना नामनिर्देशित करील. या प्रयोजनार्थ, सर्व महाविद्यालयांतील, परिसंस्थेतील व विद्यापीठ विभागातील राष्ट्रीय सेवा योजनेच्या, राष्ट्रीय छात्र सेनेच्या, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रमांच्या नामनिर्देशित केलेल्या विद्यार्थ्यांची यादी विद्यापीठामध्ये एकत्रित करण्यात येईल आणि त्यानंतर त्या प्रवर्गातील अत्युच्च कामगिरी व यश संपादन केलेल्या विद्यार्थ्याला नामनिर्देशित करण्यात येईल.

५. नामनिर्देशित करताना, अत्युच्च कामगिरी किंवा यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांची संख्या समान झाली असेल अशा बाबतीत, मागील वर्षामध्ये परीक्षेत उच्चतर गुण, टक्केवारी, किंवा यथास्थिती, श्रेणी ज्या उमेदवाराने मिळवलेली असेल त्या उमेदवारास नामनिर्देशनासाठी प्राधान्य देण्यात येईल, आणि जर त्यानंतरही ती संख्या समान राहत असेल तर, मागील वर्षात उच्च शैक्षणिक कामगिरी केलेल्या उमेदवारास प्राधान्य देण्यात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**द. रा. कहार,**

शासनाचे उप सचिव.

## HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk
Mantralaya, Mumbai 400 032, dated the 26th October 2018.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA PUBLIC UNIVERSITIES ACT, 2016.

No. PARINI- 2018/C. R. No. 103/VISHI-2.— In exercise of the powers conferred by sub-section (*10*) of section 72 read with clause (*f*) of sub-section (*2*), clause (*f*) of sub-section (*3*) and sub-clause (v)of clause (b) of sub-section (*4*) of section 99 of the Maharashtra Public Universities Act, 2016 (Mah. Act No. VI of 2017), the Government of Maharashtra hereby, prescribes the following Uniform Statute relating to nomination of students from National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities on Students' Council, namely :—

### UNIFORM STATUTE NO. 7 OF 2018.

1. Short title.—This Statute may be called the Maharashtra Public Universities (Nomination of students from National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural activities on Students' Council) Uniform Statute, 2018.

2. *Nomination of students on Students Council* :— The nomination from National Service Scheme, National Cadet Corps, Sports and Cultural Activities to University Department Students' Council/ College Students' Council / University Students' Council shall be done by the Vice Chancellor on the basis of outstanding performance of the highest level by a student in the respective activities in the preceding academic year as prescribed herein below –

(1) *From National Service Scheme* :—The student shall have participated for at least one year in the National Service Scheme programme as enrolled volunteer and shall have attended minimum 120 hours of work in the year and attended at least one camp of minimum seven days duration. Such student shall have the highest level of performance/achievement in the participation of camps, competitions, parades and any other event at Regional / State / National / International level as National Service Scheme volunteer of the college or institution or University Department, as the case may be, in the preceding year.

(2) *From National Cadet Corps* :—The student shall have undergone formal NCC training in Senior Division for at least one year and shall have attended at least 75% of NCC parades and shall have attended at least one NCC Annual Training Camp (ATC). Such student shall have the highest level of performance/ achievement in the NCC 'B' / 'C' certificate examination and/or in the participation of camps, competitions, parades and other event at Regional / State / National / International level as NCC Cadet of the college or institution or University Department, as the case may be in the preceding year.

(3) *From Sports* :—The student shall have represented the college in the inter-collegiate tournaments at least once. Such student shall have the highest level of performance/achievement as the individual or team representative of the College/ institution /University Departments in the sports tournaments, competitions, events at the inter-collegiate / inter-zone / inter-university sports tournaments organized by the university or Association of Indian Universities or the State or Central Government authorities as the representatives of the college or institution or University, as the case may be, in the preceding year :

Provided that, in case of non-availability of the facilities at the college or institution or University Department, as the case may be for a particular type of sports, a student participating in the sports event as above shall be considered eligible for such nomination, even if he is not representing the college or institution or University Department, as the case may be.

(4) *From Cultural Activities* :—A student shall have the highest level of performance/achievement as an individual or team representative of college or institution or University Department, as the case may be, in the cultural competitions and events such as dance, drama, music, elocution, debate,

literature, fine arts, etc. organized by the University or Association of Indian Universities or any State or Central Government Authorities (events like – youth festival, *Indradhanushya,* State or National youth festival) at the inter-collegiate or inter-zone or inter-university or State or National or International level as the representatives of the college or institution or University Department, as the case may be, in the preceding year.

3. The student to be nominated shall have cleared all heads of passing in the preceding year without any backlog and / or benefit of ATKT.

4. The President of University Students' Council shall nominate such students to University Students' Council in consultation with Director of Students' Development. For this purpose, the list of nominated students of N.S.S., N.C.C., Sports and Cultural Activities of all colleges, institutions and University Departments shall be collected at the University and therefrom the student with highest level of performance/ achievement in that category shall be nominated.

5. While making the nominations, in case of equality of the highest performance/achievement, the candidate of higher class in the preceding year shall be given preference in nomination and if equality persists even thereafter, the candidate with higher academic performance in the preceding year shall be given preference.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

D. R. KAHAR,

Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 EDITOR : I/C DIRECTOR SHRI MANOHAR SHANKAR GAIKWAD.